फेब्रुवारी-२०२५ * अंक-८ वा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2024-25





आर.आय.प्रेसिडेंट
**रो. स्टेफनी अर्चिक**



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
**रो. राजिंदरसिंग खुराना**



प्रेसिडेंट
**रो. ॲड. सागर चित्रे**



ऑन.सेक्रेटरी
**रो. पराग अग्रवाल**



बुले.कमिटी चेअरमन
**रो. स्वाती ढाके**

THE MAGIC OF ROTARY




BACHPAN
CLUB THEME 2024-25

## संपादकीय....✍

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

आपल्या अजिंठा बुलेटिन च्या या नवीन अंकात आपले सहर्ष स्वागत! या वर्षी आपण क्लबचा अमृत महोत्सव वर्ष साजरा करत आहोत. ६ फेब्रुवारी रोजी आपण आपल्या क्लब चा चार्टर्ड डे उत्साहात साजरा करत आहोत. रोटरी क्लब जळगाव ही केवळ एक संघटना नसून, समाजासाठी निःस्वार्थ सेवेचे एक मजबूत प्रेरणास्थान आहे. आतापर्यंत आपल्या क्लबने विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले–आरोग्य तपासणी शिबिरे, शिक्षणासाठी मदत, पर्यावरण संवर्धन मोहिमा आणि अनेक सेवा प्रकल्प. 'सेवा परमो धर्मः' या तत्त्वावर विश्वास ठेवून, आपण गरजूंच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवत आहोत.

आगामी काळातही आपल्या क्लबकडून अनेक महत्त्वाचे उपक्रम राबवले जाणार आहेत. हे प्रकल्प आपल्या समाजासाठी फार उपयुक्त ठरतील. त्यामुळे सर्व सदस्यांनी अधिक जोमाने सहभाग घ्यावा, ही विनंती!

रोटरी ही केवळ सेवाभावी चळवळ नसून, ती एक संधी आहे – शिकण्याची, नेतृत्व विकसित करण्याची आणि जीवनभर टिकणाऱ्या मैत्री जपण्याची! आपल्या क्लबचा हा एकत्रित प्रवास असाच यशस्वी होत राहो, हीच इच्छा!

सर्व सभासद, प्रायोजक आणि हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार! चला, आपण सर्व मिळून रोटरी क्लब जळगावला समाजसेवेचे एक आदर्श केंद्र बनवूया.

फेब्रुवारी महीना हा शांतता– संघर्ष निवारण रोटेरिचा डेजिग्रेटिड मंथ आहे. त्यावर सविस्तर माहिती पान नंबर.४ आहे. मागील महीन्यात आपण डिस्ट्रिक्ट कॉन्फ्रेंस अटेंड केली त्यावर माहीती पान नंबर. ७ वर आहे.

रोटरी हाच सेवा आणि मैत्रीचा ध्यास !

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम,

मित्रांनो, नवीन वर्षाची सुरुवात अपाल्या क्लबने उत्साहाने साजरी केली. ह्या महिन्यात आपल्या क्लब तर्फे डिस्ट्रीक्ट ३०३० च्या नागपूर येथे झालेल्या डिस्ट्रीक्ट कॉन्फ्रेंस मध्ये एकूण ७८ सदस्यांनी नाव नोंदविले होते व त्यात आपल्या क्लब तर्फे ६७ सदस्यांनी प्रत्यक्षात सहभाग नोंदवला व त्यात आपल्या क्लबला डिस्ट्रीक्ट कडून मैक्सिमम पार्टिसिपेशन चा ॲवार्ड ही मिळाला आहे. व त्यासाठी क्लब अध्यक्ष म्हणून मी सर्वांचा मनापासून अभिनंदन करतो. ह्या महिन्यात १४ जानेवारीला आपल्या क्लब तर्फे मकर संक्रांतीच्या सणाच्या दिवशी आपल्या क्लब सदस्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला व पतंग उडविण्याचा आनंदही घेतला. सदरहू कार्यक्रमात एकूण १०० सदस्यांनी त्यांच्या परिवारासह पतंग उडविले व त्या सोबत भाज्यांचाही आस्वाद घेतला. सदर कार्यक्रमासाठी प्रोजेक्ट चेअरमन रो.मधुरा जहागीदार व रो.रितेश जैन यांनी परिश्रम घेतले. तसेच आपल्या क्लब तर्फे भुसावळ येथील के.एन.नारखेडे शाळेत आपल्या डिस्ट्रीक्टचा प्रोजेक्ट म्हणजे आयडल स्टडी ॲप च्या ही वितरण ही करण्यात आले व एकूण ७५ ॲप्स् विद्यार्थ्यांना मोफत देण्यात आले.

ह्या महिन्यात आपल्या क्लब तर्फे १३ कॅटरॅक्ट सर्जरी ही विष्णूलिला हॉस्पीटल येथे करण्यात आली व त्यासाठी पीपी रो.डॉ.तुषार फिरके यांनी परिश्रम घेतले. व्होकेशनल मंथ असल्यामुळे आपल्या तर्फे रोटरी इंडिया लिटरसी मिशन अंतर्गत ११ शिक्षकांना नेशन बिल्ड ॲवार्ड ने गौरव करण्यात आले असून रो.पंकज व्यवहारे व रो.सुबोध सराफ यांनी परिश्रम घेतले.

पुढील महिना हा पिस बिल्डींग ॲन्ड कन्फिलक्ट प्रिव्हेशन मंथ म्हणून आहे. तसेच आपल्या क्लबला ६ फेब्रुवारीला चार्टर डे म्हणून हा आपण साजरा करणार आहे.

**– रो. ॲड. सागर चित्रे**


# जानेवारी महिन्यातील साप्ताहिक सभा

**✻ ३ जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा ही बिझनेस मिटींग होती. यात ११ व १२ जानेवारी रोजी होणाऱ्या डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स बाबत चर्चा करण्यात आली. डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स चेअरमन रो.उदय पोतदार यांनी विशेष परिश्रम घेतल्यामुळे आपल्या क्लब कडून ७८ सदस्यांनी कॉन्फरन्स साठी नोंदणी केली.




**✻ १० जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा घेण्यात आली नाही.

**✻ १७ जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभेचा विषय होता. 'इन्प्रेशन ऑफ डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स' यावेळी कॉन्फरन्स अटेंड केलेल्या मान्यवरांनी कॉन्फरन्स बद्दल माहिती सादर केली.






**✻ २४ जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभे मध्ये विविध शाळेतील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ११ शिक्षकांना नेशन बिल्डर ॲवार्डने सन्मानित करण्यात आले. सर्व शिक्षक हे आपल्या रोटरी क्लब जळगाव तर्फे चालविल्या जाणाऱ्या इंटरॅक्ट क्लब मधील शाळेतील होते.

**✻ ३१ जानेवारी –** रोजी आयोजित साप्ताहिक सभा रोटरी क्बल जळगावचे माजी सदस्य स्व.मोहनलालजी मोतीलालजी अग्रवाल यांच्या निधनामुळे शोकसभा घेण्यात आली.

# जानेवारी महिन्यातील प्रोजेक्टस्

**✻ ५ व ६ जानेवारी –** रोजी रोटरी क्लब जळगाव रॉयल्स् तर्फे आयोजित बॉक्स क्रिकेट टुर्नामिंट मध्ये रोटरी क्लब जळगाव ने टिम स्पिरीट दाखवून टुर्नामिंट जिकली.






**✻ ६ जानेवारी –** रोजी के. नारखेडे स्कूल भुसावळ येथे रोटरी क्लब तर्फे आयडल एज्युकेशन ॲप इयत्ता दहावीच्या ७५ विद्यार्थ्यांसाठी अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आले. यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष रो.ॲड.सागर चित्रे, मानद सचिव रो.श्री.पराग अग्रवाल, के. नारखेडे स्कूल विद्यालय चे शिक्षक हे उपस्थित होते.

**✻ ६ जानेवारी –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे जळगाव रेल्वे माल धक्का कॅम्प मधील १३ रूग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया विष्णुलिला डोळ्याचे हॉस्पीटल जळगाव येथे करण्यात आली. माजी अध्यक्ष रो.डॉ.तुषार फिरके व डॉ.काजल फिरके यांनी सर्व ऑपरेशन केले. याचे प्रायोजकत्व रो.कंवरलालजी संघवी यांनी घेतले.






**✻ १४ जानेवारी –** रोजी रोटरी क्लब जळगाव तर्फे पतंग महोत्सव साजरा करण्यात आला. या प्रोजेक्टचे चेअरमन रो.रितेश जैन, रो.मधुरा जहागीरदार यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी डीजीएन डॉ.राजेश पाटील हे उपस्थित होते. तसेच इतर रोटेरियन्स् यांनी परिवारासह उपस्थित राहून आनंद द्विगुणीत केला.

७X७X७ प्रोजेक्ट अंतर्गत – रो.स्वाती ढाके, रो.प्रज्ञा जंगले, रो.शमा सराफ, रो.शुभदा कुलकर्णी, रो.गिरीश कुलकर्णी, रो.डॉ.पराग जहागीरदार यांची व्याख्याने झाले.





# शांतता व संघर्ष निवारण आणि निराकरण

रोटरी इंटरनॅशनलने फेब्रुवारी महिना 'शांतता व संघर्ष निवारण आणि निराकरण' या उद्दिष्टासाठी समर्पित केला आहे. जगभरातील रोटरी क्लब आणि सदस्य या महिन्यात शांतता स्थापन करण्यासाठी विविध उपक्रम राबवतात. समाजातील तणाव कमी करणे, संवाद वाढवणे आणि संघर्षांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे हे या उपक्रमांचे मुख्य उद्दिष्ट असते.

**शांततेचे महत्त्व :–** शांतता हा कोणत्याही समाजाच्या प्रगतीसाठी अत्यावश्यक घटक आहे. शांततेशिवाय स्थिरता, विकास, आणि सहिष्णुता अशक्य आहे. परंतु, आजच्या जागतिक परिस्थितीत युद्धे, दहशतवाद, भेदभाव, आणि असमानता यांसारख्या समस्यांमुळे शांततेस धोका निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत, रोटरी इंटरनॅशनल शांततेचा प्रसार करून संघर्षांचे निराकरण करण्यावर भर देते.

**रोटरीचे योगदान :–** रोटरी इंटरनॅशनल शांतता स्थापन करण्यासाठी जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. रोटरी शांतता शिष्यवृत्ती कार्यक्रमांतर्गत दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांना शांतता आणि संघर्ष निवारण याबाबत शिक्षण दिले जाते. याशिवाय, रोटरी विविध प्रकल्पांच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन, शिक्षण प्रोत्साहन, आणि सामाजिक समता निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

संघर्ष निवारण आणि निराकरणासाठी उपाययोजना

१. **संवाद वाढवा :** संवाद ही कोणत्याही संघर्षाच्या निराकरणाची किल्ली आहे. लोकांमध्ये संवाद निर्माण करण्यासाठी रोटरी क्लब चर्चासत्रे आणि कार्यशाळा आयोजित करतात.

२. **शिक्षण:** शिक्षणाच्या माध्यमातून लोकांमध्ये सहिष्णुता आणि परस्पर आदर यांची भावना निर्माण केली जाऊ शकते.

३. **स्थानिक स्तरावर काम:** प्रत्येक समाजातील समस्या वेगवेगळ्या असतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर समस्या ओळखून त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.


४. **सामाजिक प्रकल्प:** आरोग्य, पाणीपुरवठा, आणि आर्थिक स्थिरता यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यास संघर्षांची शक्यता कमी होते.

**शांतता निर्माणासाठी रोटरी सदस्यांची भूमिका–** रोटरी सदस्य हे शांततेचे राजदूत आहेत. ते लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात, मदतकार्य राबवतात आणि संघर्ष टाळण्यासाठी सकारात्मक वातावरण तयार करतात. याशिवाय, रोटरी सदस्यांचे योगदान केवळ जागतिक स्तरावरच नव्हे, तर स्थानिक पातळीवरही महत्त्वाचे ठरते.

**निष्कर्ष :–** फेब्रुवारी महिना शांतता आणि संघर्ष निवारणासाठी रोटरीच्या कटिबद्धतेचा महत्त्वाचा टप्पा आहे. जगभरातील रोटरी सदस्यांनी शांततेच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न प्रेरणादायी आहेत. प्रत्येक व्यक्तीने शांततेच्या दिशेने एक पाऊल उचलल्यास जग अधिक सुंदर आणि सुरक्षित होऊ शकते. रोटरीचा हा उद्देश फक्त एका महिन्यापुरता मर्यादित नसून, तो कायमस्वरूपी शांततेसाठी प्रेरणादायी आहे.

# इतिहासातील सुवर्ण पान

**पी.पी. रो. प्रा.रमेश लाहोटी**



माजी अध्यक्ष प्राध्यापक रो. रमेश लाहोटी सर १९८४ साली रोटरी क्लब जळगावचे सभासद झाले होते . त्यांनी १९९६– ९७ साली रोटरी क्लब जळगाव चे अध्यक्षपद भूषविले. त्यांच्या मते अध्यक्षपद भूषवणही आयुष्यातील एक संस्मरणीय संधी आहे. रोटरीचा कार्यकाळ फक्त एकदाच आणि फक्त एक वर्षासाठीच मिळतो. आपल्यातील नेतृत्व व कर्तृत्वाची झलक या वर्षात आपल्याला दाखवायची असते .त्यांनी वर्षभरात केलेले प्रेरणादायक काम खालील प्रमाणे:–

१. त्यांनी घेतलेल्या शिवण क्लास वर्गामध्ये ८०० च्या वर भगिनींनी लाभ घेतला.

२. प्रसिद्ध व्याख्याते सुरेश पांडे यांचे मार्गदर्शन त्यांनी घेतलेल्या व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेला लाभले. यात प्रचंड प्रतिसाद मिळाला. संभाषण कला, मुलाखत तंत्र व देहबोली हे या कार्यशाळेचे विषय होते. यासाठी रो. पी .पी. शांतीकुमार दमानी,रो. केशरलाल भदादे रो.कवरलालजी संघवी,रो.पी.पी.अशोक जोशी यांनी हातभार लावला होता.

३. एड्स अवेअरनेस सेमिनार सुद्धा त्यांनी सिव्हिल सर्जन व मेडिकल ऑफिसर यांच्या विशेष उपस्थितीमध्ये, पॅनलच्या तिस–्या सदस्या डॉ. मनीषा दमानी व रो.डॉ.प्रदीप जोशी यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. श्रोत्यांना एक उद्बोधक कार्यक्रम ऐकावयास मिळाला .

४.. आजारी उद्योग समस्या व निवारण असा अभिनव उपक्रमही त्यांनी उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक एस .एस. पाटील व त्यांचे सहकारी यांच्या आग्रहाचे व प्रेम कोगटा यांच्या मदतीने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यासाठी अनेक मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

५. जेष्ठनागरिक संघाच्या सदस्यांसाठी वैद्यकीय आरोग्य तपासणी शिबिर त्यांनी आयोजित केले होते.

६. वंचित व उपेक्षित समाजातील मुली मुलांनी सुद्धा बारावीत मेरिटमध्ये यावे म्हणून लोकमतच्या सहकार्याने त्यांनी मार्गदर्शन व सराव शिबिरही आयोजित केले होते त्यात ६० मुलांनी सहभाग घेतला होता. ७.दिग्गजांची व्याख्यानमालाही त्यांनी आयोजित केली होती. यात पहिले पुष्प सुप्रसिद्ध उद्योगपती पद्मश्री भवरलालजी जैन, दुसरे पुष्प मुंबई स्टॉक एक्सचेंज श्री दमानी यांनी गुंफले. शहरातील सर्व जाणकार ब्रोकर, जिज्ञासू जातीने हजर होते.

७. याबरोबरच रात्र पुनवेची हा एक सदाबहार सांस्कृतिक कार्यक्रमाही त्यांनी सादर केला यात क्लबच्याच कलाकारांनी व्यावसायिक कलाकारांच्या ऐटीत गाणे सादर केले. यात हेमा सोनाळकरांचे , गौरी राणें, वृषाली जोशींचे , सोनाली कुलकर्णी , अस्मिता पाटील, प्रवीण जंगले आणि राम टेकवाणी यांचा एकापेक्षा एक सरस गीत सादर केले. या कार्यक्रमास रो. पी.पी.अशोक जोशी यांनी विशेष परिश्रम घेतले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे त्यांच्या पदग्रहण सोहळ्यासाठी ख्यातनाम नाटककार श्री वसंत कानेटकर हे आले होते त्यांच्या उत्स्फूर्त भाषणाने श्रोते मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्यात डिस्ट्रिक्टचे बरेच पदाधिकारी व शहरातील मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या मते सर्व संचालक मंडळ व सर्व समिती प्रमुखांनी आपापली जबाबदारीत जीव ओतून काम केल्यामुळे त्यांचा कार्यकाळ हा संस्मरणीय ठरला.





# नवीन सदस्यांचे स्वागत व परिचय


रो.निपुण बजाज


रो.प्रमोद नारखेडे


रो.सुनिल सोनार


रो. मोहीत बोथरा


रो.डॉ.रवि हिराणी


रो.कुणाल झवर


रो. अंकुश बडेर


रो.ॲड.आनंद मुजुमदार


रो.स्वप्नील सुराणा


रो.डॉ.हर्षल पाटील


रो.सानिया चित्रे


रो.प्रिती महाजन


रो.चैताली चौधरी


रो.ॲड.महेश भोकरीकर


रो.परीक्षित भदादे


रो.मधुरा जहागीरदार


रो.कमलेश चांदवाणी

# डिस्ट्रीक्ट कॉन्फरन्स चे काही छायाचित्रे

























## जीवेत् शरदः शतम्..!

| | |
|---|---|
| १) ३ फेब्रुवारी | रो. स्नेहल फासे |
| २) ४ फेब्रुवारी | रो. जयेश ठाकूर |
| ३) १० फेब्रुवारी | रो. अशोक भ. जैन |
| ४) २२ फेब्रुवारी | रो. निलेश झोपे |
| ५) २३ फेब्रुवारी | रो. विश्वजीत ब-हाटे |
| ६) २६ फेब्रुवारी | रो. शमा सराफ |

## नांदा सौख्यभरे...

| | |
|---|---|
| १) २ फेब्रुवारी | रो. मनोज जोशी |
| २) ३ फेब्रुवारी | रो. नंदकिशोर जाखेटीया |
| ३) ३ फेब्रुवारी | रो. अरविंद हासवानी |
| ४) ९ फेब्रुवारी | रो. डॉ. सागर जावळे |
| ५) ११ फेब्रुवारी | रो. रितेश जैन |
| ६) १६ फेब्रुवारी | पी.पी. रो. अशोक जोशी |
| ७) १८ फेब्रुवारी | रो. पराग जहांगिरदार |
| ८) १८ फेब्रुवारी | रो. सुशांत राका |
| ९) २२ फेब्रुवारी | रो. नितीन काळुंखे |
| १०) २७ फेब्रुवारी | पी.पी. रो. सुरेश केसवानी |

## फेब्रुवारी महिन्यातील कॅप्टन

सदर कॅप्टन यांनी फेब्रुवारी महिन्यात क्लबच्या सर्व कमिटी चेअरमन यांचेशी समन्वय साधून त्यांच्या कामात मदत करणे.



**रो.गिरीश कुलकर्णी**



**रो.ॲड.हेमंत भंगाळे**

## अभिनंदन!

* पीपी.रो.डॉ.दिपक पाटील यांना आरंभ मराठी चॅनल आयोजित 'खान्देश रत्न पुरस्कार २०२५' देऊन सन्मानित करण्यात आले.
* रो.डॉ.काजल फिरके यांची एस.एम.बी.टी. आयुर्वेदिक कॉलेज ॲन्ड हॉस्पीटल येथील नेत्र विभागात प्रोफेसर म्हणून पदोन्नती झाली.
* पी.पी.रो.डॉ.दिपक पाटील यांचे चिरंजीव डॉ.अनिरूद्ध पाटील यांना बेस्ट डॉक्टर्स, महाराष्ट्र २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
* रो.पंकज व्यवहारे यांना आयकॉन ऑफ लातूर एज्युकेशन ॲवार्ड ने सन्मानित करण्यात आले.

## * श्रद्धांजली *

**रोटरी क्लब जळगावचे माजी सदस्य एम. एम. अग्रवाल यांचे दु:खद निधन झाले.**

